आदेश

आरोग्य सेवक महिला वर्ग 3 या संवर्गातील कर्मचा-यांना स्टेपलॅडर प्रशिक्षण उत्तीर्ण दिनांकापासुन 12 वर्षाची नियमित सेवा पुर्ण केल्याने पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी मंजुर करणे बाबत.

*जिल्हा परिषद अहिल्यानगर*
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं. आरोग्य/कार्या-2/आस्था-4/ 188 /2025
दिनांक 04/03/2025

वाचा :- 1) महाराष्ट्र शासन साप्रवि यांचेकडील शासन निर्णय क्रं.एसआरव्ही /1095/प्र.क्र.1/95 /12 दि.08/06/1995
2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं वेतन/ 1199/प्र.क्र.2/सेवा 3 दि.20/07/2001
3) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.वेतन/ 2000/प्र.क्र.10/99/सेवा 3 दि.03/08/2001
4) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.वेतन/ 1106/प्र.क्र.30/सेवा 3 दि.10/09/2007
5) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.वेतन/ 1109/प्र.क्र.43/सेवा 3 दि.31/08/2009
6) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.वेतन/ 1109/प्र.क्र.24/सेवा 3 दि.09/06/2009
7) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.वेतन/ 1109/प्र.क्र.9/01/सेवा 3 दि.15/10/2009
8) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.वेतन/ 1109/प्र.क्र.44/सेवा 3 दि.01/04/2010
9) महाराष्ट्र शासन वित्त विभागा कडील परिपत्रक क्रं.वेपूर 209/ /प्र.क्र.69/सेवा 9 दि.05/05/2010
10) महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.वेतन/ 1109/प्र.क्र. 41/सेवा 3 दि.05/07/2010
11) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/का 2/आ 4/1592/03 दिनांक 10/12/2003
12) मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/का 2/आ 4/1231/08 दिनांक 16/12/2008
13) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/का 2/आ 4/931/08 दिनांक 07/12/2018
14) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/का 2/आ 4/89/2020 दिनांक 07/02/2020
15) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/का 2/आ 4/1592/2003 दिनांक 10/12/2003
16) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/का 2/आ 4/372/2004 दिनांक 10/05/2004

महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील संदर्भ क्रमांक 1 च्या शासन निर्णयान्वये वर्ग 3 व वर्ग 4 मधील ज्या जिल्हा परिषद कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असुनही पदोन्नती मिळण्यास दिर्घ कालावधी लागतो अशा कर्मचा-यांना वर

नमुद निर्णयातील अटी व शर्तीनुसार दिनांक 01 ऑक्टोबर 1994 पासुन कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 28/05/1984 अन्वये जिल्हा परिषदेमधील पुर्वी प्रशिक्षीत ए.एन.एम. ची पदे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे मोठया प्रमाणावर रिक्त होती व त्याचा कामावर विपरीत परिणाम होत होता. त्यामुळे एक वर्षाचे प्रशिक्षण झालेल्या उमेदवारांना बहुउदेशीय आरोग्य कर्मचारी (स्त्री) या कनिष्ठ श्रेणीच्या (Down Grading) या पदावर रुपये 260 - 495 या वेतनश्रेणीमध्ये नेमणुका दिलेल्या होत्या. तदनंतर अशा बहुउदेशीय आरोग्य कर्मचारी (स्त्री) यांना 6 महिन्याचे पदोन्नतीसाठीचे प्रशिक्षण (Promotional Trainig) दिलेल्या व सदरचे प्रशिक्षण पास झालेल्या प्रशिक्षीत बहुउदेशीय आरोग्य कर्मचारी (स्त्री) एम.पी.डब्ल्यू (स्त्री) यांना ए.एन.एम. यांचे बरोबरीचे समजण्यात यावे व त्यांना प्रमोशनल प्रशिक्षण पास झालेल्या तारखे पासून 290 - 540 (सुधारीत 1200-1800) ही वेतन श्रेणी लागु करण्यात यावी असे मा. संचालक आरोग्य सेवा मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक सआसे/नर्स/सिफॉर्म/स्टेपलॅडप्रमो/कक्ष-9/89 दिनांक 16/02/1989 अन्वये आदेशीत केलेले आहे. त्यानुसार सुधारित वेतन श्रेणी लागु झालेल्या दिनांकापासुन नियमित 12 वर्षाच्या सेवेनंतर कालबध्द पदोन्नती योजना लाभ मंजुर करणे अपेक्षित होते. तथापी खालील नमुद आरोग्य सेवक महिला यांना प्रथम नियुक्ती दिनांकानुसार कालबध्द पदोन्नती योजनेचा लाभ मंजुर करण्यात आलेला असल्याने सेवा निवृत्ती वेतन प्रकरण मंजुरीसाठी आक्षेप घेण्यात येत आहे.

त्यामुळे खालील नमुद कर्मचारी यांना कालबध्द पदोन्नती दिलेल्या दिनांकामध्ये (स्तंभ क्रमांक 6) बदल करुन खालील प्रमाणे (स्तंभ क्रमांक 7) मध्ये नमुद दिनांकापासुन कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत पहिला लाभ मंजुर करण्यात येत आहे. कालबध्द पदोन्नतीच्या अनुषंगाने दिनांक 01/10/1994 ते 31/12/1995 पर्यत वेतन श्रेणी रुपये 1400 - 2800 व दिनांक 01/01/1996 ते 31/12/2005 या कालावधीमध्ये वेतन श्रेणी रुपये 4500 - 125 - 7000 ही वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे. तसेच दिनांक 01/01/2006 पासुन वेतन बँड 5200- 20200 ग्रेड वेतन 2800 रुपये अनुज्ञेय आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका | प्रथम नेमणुकीने हजर दिनांक | स्टॅपलेडर प्रशिक्षण उत्तीर्ण दिनांक | पहिला लाभ मंजुर दिनांक | स्टॅपलेडर प्रशिक्षण उत्तीर्ण दिनांका पासुन 12 वर्षे सेवापुर्ण झाल्याने पहिला लाभ मंजुर दि. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | कांबळे छाया शंकर | टाकळी खातगांव, ता नगर | 02/12/1985 | 13/09/1988 | 03/12/1997 | 13/09/2000 | |
| 2 | शेटे शोभा संजय | चास, ता नगर | 02/01/1988 | 12/03/1993 | 03/01/2000 | 12/03/2005 | |

उपरोक्त कर्मचारी यांचे कालबध्द पदोन्नती मंजुर दिनांक रकाना 6 मध्ये बदल करुन रकाना 7 मध्ये नमुद दिनांकापासुन मंजुर करण्यात आल्याने त्यांची फेर वेतन निश्चिती करण्यात यावी. तसेच अतिप्रदान होत असल्यास संबंधित कर्मचा-याकडुन रक्कम वसुल करण्यात यावी. सदर आदेशाची नोंद संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत येवुन सदर आदेशाची सत्वर अंमलबजाणी करणेत यावी.

सदर आदेश *अहिल्यानगर* जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202503041000040 असा आहे.

(आशिष येरेकर,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ***अहिल्यानगर***

प्रति,

श्रीमती सर्व संबंधीत कर्मचारी यांना कार्यालय प्रमुखामार्फत

द्वारा व प्रत :- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र ------------------------- ता.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सविनय सादर,

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती -----------------

प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, -----------------------------

(आशिष येरेकर,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ***अहिल्यानगर***